महाराष्ट्र शासन

जिल्हा निवड समिती, जिल्हाधिकारी कार्यालय,भंडारा

नगर परिषदांमध्ये राज्यस्तरीय संवर्गातील रिक्त पदे सरळसेवेने भरणेबबतची जाहिरात.

जाहिरात क्रं. कार्या-१२/कलि/नपाप्र/संवर्ग पदभरती/कावि/८९७ /२०१२ दि. १२ /१२/२०१२.

जाहीरात क्रं.१ / २०१२

अर्ज स्विकारण्याचा शेवटचा दिनांक २७/१२/२०१२

परीक्षेचा दिनांक :- १३/०१/२०१३.

मा. आयुक्त तथा संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचेकडील पत्र क्रं. नपप्रंस कक्ष-५/संवर्ग/श्रेणी-क/भंडारा/२०१० दिनांक ३१.०१.२०११ अन्वये जिल्हाधिकारी भंडारा यांचे अधिनस्त नगर पालिका कर्मचारी राज्यस्तरीय संवर्गातील नगर परिषदेच्या आस्थापनेवरील श्रेणी-क-१ व श्रेणी-क-२ मधील सरळसेवेची रिक्त पदे जिल्हा निवड समिती भंडारा मार्फत सरळ सेवेने भरण्याकरिता खुल्या व मागास प्रवर्गातील पात्र उमेदवाराकडून खालील अटीच्या अधीन राहून लेखी स्पर्धा परिक्षेकरिता **२७ डिसेंबर २०१२ रोजी सायं. ५.४५ वाजेपर्यंत (Online) पध्दतीने** अर्ज मागविण्यांत येत आहे. **Online** व्यतिरीक्त अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

जाहिरात व अर्जाचा नमुना www.bhandara.nic.in व **www.collectorbhn.in** या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

**नगर पालिका कर्मचारी राज्यस्तरीय संवर्गातील नगर परिषदेच्या आस्थापनेवरील श्रेणी-क -१ व २ संवर्गात उपलब्ध पदांचा तपशील**

**१) पदाचे नांव :- महाराष्ट्र नगर परिषद अभियांत्रिकी सेवा (स्थापत्य) (श्रेणी - क)**
**वेतन श्रेणी ९३००-३४८०० ग्रेड पे ४२००/-**
**एकूण - ०२ पदे**

| अनुशेषाचा प्रवर्ग | रिक्त पद संख्या | महिला | माजी सैनिक | खेळाडू | प्रकल्प ग्रस्त | भूकंप ग्रस्त | अंश कालिन | समांतर आरक्षण व्यतिरिक्त | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| अनु.जाती | ०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | ०१ |
| अनु.जमाती | ०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | ०१ |
| एकूण | ०२ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०२ | ०२ |

**२) पदाचे नांव :- महाराष्ट्र नगर परिषद अभियांत्रिकी सेवा (विद्युत) (श्रेणी - क)**
**वेतन श्रेणी ९३००-३४८०० ग्रेड पे ४२००/-**
**एकूण-०१ पदे**

| अनुशेषाचा प्रवर्ग | रिक्त पद संख्या | महिला | माजी सैनिक | खेळाडू | प्रकल्प ग्रस्त | भूकंप ग्रस्त | अंश कालिन | समांतर आरक्षण व्यतिरिक्त | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| खुला | ०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | ०१ |
| एकूण | ०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | ०१ |

// २ //

३) पदाचे नांव :- महाराष्ट्र नगर परिषद अभियांत्रिकी सेवा (संगणक) (श्रेणी -क)
वेतन श्रेणी ९३००-३४८०० ग्रेड पे ४२००/-
एकूण - ०२ पदे

| अनुशेषाचा प्रवर्ग | रिक्त पद संख्या | महिला | माजी सैनिक | खेळाडू | प्रकल्प ग्रस्त | भूकंप ग्रस्त | अंश कालिन | समांतर आरक्षण व्यतिरिक्त | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| अनु.जाती | ०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | ०१ |
| खुला | ०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | ०१ |
| एकूण | ०२ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०२ | ०२ |

४) पदाचे नांव :- महाराष्ट्र नगर परिषद जलदाय, पाणी पुरवठा व स्वच्छता अभियांत्रिकी सेवा (श्रेणी -क)
वेतन श्रेणी ९३००-३४८०० ग्रेड पे ४२००/-
एकूण - ०४ पदे

| अनुशेषाचा प्रवर्ग | रिक्त पद संख्या | महिला | माजी सैनिक | खेळाडू | प्रकल्प ग्रस्त | भूकंप ग्रस्त | अंश कालिन | समांतर आरक्षण व्यतिरिक्त | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| अनु.जाती | ०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | ०१ |
| अनु.जमाती | ०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | ०१ |
| खुला | ०२ | ०१ | -- | -- | -- | -- | -- | ०१ | ०२ |
| एकूण | ०४ | ०१ | -- | -- | -- | -- | -- | ०३ | ०४ |

५) पदाचे नांव :- महाराष्ट्र नगर परिषद लेखा व लेखापरिक्षण सेवा (श्रेणी क)
वेतन श्रेणी ९३००-३४८०० ग्रेड पे ४२००/-
एकूण - ०२ पदे

| अनुशेषाचा प्रवर्ग | रिक्त पद संख्या | महिला | माजी सैनिक | खेळाडू | प्रकल्प ग्रस्त | भूकंप ग्रस्त | अंश कालिन | समांतर आरक्षण व्यतिरिक्त | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| अनु.जाती | ०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | ०१ |
| अनु.जमाती | ०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | ०१ |
| एकूण | ०२ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०२ | ०२ |

**६) पदाचे नांव :- महाराष्ट्र नगर परिषद अग्निशमन सेवा (श्रेणी क-२)**
**वेतन श्रेणी ५२००-२०२०० ग्रेड पे २८००/-**
**एकूण - ०२ पदे**

| अनुशेषाचा प्रवर्ग | रिक्त पद संख्या | महिला | माजी सैनिक | खेळाडू | प्रकल्प ग्रस्त | भूकंप ग्रस्त | अंश कालिन | समांतर आरक्षण व्यतिरिक्त | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| अनु.जाती | ०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | ०१ |
| खुला | ०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | ०१ |
| एकूण | ०२ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०२ | ०२ |

२.टिप :-

२.१ वर नमुद केलेल्या पदांच्या संख्येत व आरक्षणात बदल होण्याची शक्यता असून पदांची संख्या,समातर आरक्षण,सामाजिक आरक्षण याबाबत बदल करणे व रद्य करणे तसेच भरती प्रक्रिया कोणत्याही प्रशासकीय कारणास्तव रद्य वा पुढे ढकलण्याचे किंवा त्यात फेरबदल करण्याचे सर्वाधिकार जिल्हाधिकारी भंडारा यांचेकडे राखीव राहतील आणि याबाबत अर्जदारांना कोणताही दावा करता येणार नाही.

२.२ महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्याच प्रवर्गातील पुरुष उमेदवारामधून पद भरण्यात येईल.

**२.३(१) महीला उमेदवाराकरीता :-**

खुल्या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती/कुटुंबातील (क्रिमीलेअर) महिला उमेदवारांना तसेच मागासवर्गीय प्रवर्गातील इतर मागासवर्ग,जि(अ)भ.ज.(क)व भ.ज.(ड) महिला उमेदवारांना माहिलांसाठी असलेले ३०% आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.

**(२) माजी सैनिक उमेदवाराकरीता :-**

माजी सैनिक या समांतर आरक्षणातील पदाकरिता आवेदन पत्र सादर करतांना माजी सैनिक म्हणून शासन सेवेतील पात्र उमेदवार असावा.माजी सैनिक या समांतर आरक्षणाचा पुर्वी लाभ घेवून शासकीय सेवेत नौकरी स्विकारली असेल तर समांतर आरक्षणाचे लाभास शासन निर्णय क्रमांक आरटीए-१०९०/प्र.क्रं.६/९३/१२ दिनांक ८ जून १९९३ नुसार पात्र राहणार नाही.

**(३) अंशकालीन पदवीधर उमेदवारांकरिता :-**

अशकांलीन पदवीधर / पदवीकाधारक उमेदवारांनी जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रातील अद्यावत नोंदणी केलेली असावी.अंशकालीन पदविधर उमेदवारांनी समांतर आरक्षणाचा पूर्वी लाभ घेऊन शासकीय शासकीय सेवेत सेवेत नौकरी स्विकारली असेल तर समांतर आरक्षणाचे लाभास शासन पत्र क्रं.प.अंक-१०१०/७१७/प्र.क्रं.३२२/१०/१६-अ दिनांक २६ ऑगष्ट २०१० पात्र राहणार नाही.

**(४) प्रकल्पग्रस्त व भुकंपग्रस्त उमेदवारांकरिता :-**

प्रकल्पग्रस्त व भुकंपग्रस्त उमेदवारांनी प्रकल्पग्रस्त व भुकंपग्रस्त असल्याबाबतचे संबंधित जिल्हा पुनर्वसन अधिका-याकडील प्रमाणपत्र आवश्यक राहील.

**(५) स्वातंत्र्य सैनिक उमेदवाराकरीता :-**

स्वातंत्र सैनिकाच्या नामनिर्देशित पाल्यांना आरक्षण नसून नियुक्तीकरीता पसंतीक्रम आहे. त्यामुळे जाहीरातीनूसार अर्ज करतांना तसे अर्जात नमुद करुन नामनिर्देशित असावे.

## ३. राज्यस्तरीय संवर्ग श्रेणी- क व श्रेणी-क-२ या पदासाठी शैक्षणिक पात्रता विषयक अटी :-

| पदाचा संकेतांक | पदाचे नांव व वेतनश्रेणी | आवश्यक शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र नगर परिषद अभियांत्रिकी सेवा ( स्थापत्य ) (श्रेणी-क)<br>वेतनश्रेणी ९३००-३४८०० ग्रेड पे. ४२००/- | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी पदवी (बी.ई सिव्हील ) किंवा पदविका (डी. ई सिव्हील ) आवश्यक.<br>२. MS-CIT परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>३. मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक. |
| २ | महाराष्ट्र नगर परिषद अभियांत्रिकी सेवा ( विद्युत ) (श्रेणी-क)<br>वेतनश्रेणी ९३००-३४८०० ग्रेड पे. ४२००/- | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाची विद्युत अभियांत्रिकी पदवी (बी.ई विद्युत ) किंवा पदविका (डी. ई. विद्युत ) आवश्यक.<br>२. MS-CIT परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>३. मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक. |
| ३ | महाराष्ट्र नगर परिषद अभियांत्रिकी सेवा ( संगणक ) (श्रेणी-क)<br>वेतनश्रेणी ९३००-३४८०० ग्रेड पे. ४२००/- | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाची संगणक अभियांत्रिकी पदवी (बी.ई संगणक ) किंवा पदविका (डी. ई. संगणक ) आवश्यक.<br>२. MS-CIT परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>३. मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक. |
| ४ | महाराष्ट्र नगर परिषद जलदाय, मलनिस्सारण व स्वच्छता अभियांत्रिकी सेवा (श्रेणी-क)<br>वेतनश्रेणी ९३००-३४८०० ग्रेड पे. ४२००/- | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाची यांत्रिकी/पर्यावरण अभियांत्रिकी पदवी (B.E. Mechanical / Environmental ) किंवा यांत्रिकी/पर्यावरण पदविका (D.E. Mechanical / Environmental ) आवश्यक.<br>२. MS-CIT परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>३. मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक. |
| ५ | महाराष्ट्र नगर परिषद लेखा परिक्षण व लेखापाल सेवा (श्रेणी-क)<br>वेतनश्रेणी ९३००-३४८०० ग्रेड पे. ४२००/- | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाची वाणिज्य शाखेची पदवी Member of Institution of Cost and Work Accounts ( I.C.W.A.) किंवा सनदी लेखापाल (Chartered Accountant ) असणे आवश्यक.<br>२. MS-CIT परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>३. मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक. |

| पदाचा संकेतांक | पदाचे नांव व वेतनश्रेणी | आवश्यक शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| ६ | महाराष्ट्र नगर परिषद अग्नीशमन सेवा ( श्रेणी-क-२ ) वेतनश्रेणी ५२००-२०२०० ग्रेड पे. २८००/- | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी असणे आवश्यक.<br>२. राष्ट्रीय अग्नीशमन सेवा महाविद्यालय, नागपूर येथील उपस्थानक अधिकारी अभ्यासक्रम ( Sub Officers Course )<br>३. MS-CIT परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>३. मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक. |

**४. वयोमर्यादा :-**

४(१) शासन निर्णय दिनांक १७ ऑगष्ट २००४ मधील तरतुदीनुसार वरील सर्व पदासाठी उमेदवाराचे वय दिनांक ३०.११.२०१२ रोजी किमान १८ वर्ष व कमाल ३३ वर्ष (खुला प्रवर्गासाठी) असावे.

४ (२) उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम.

४ (३) महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवाराकरीता कमाल ३८ वर्षापर्यत.

४ (४) शासन निर्णय दिनांक २८.५.१९९२ नुसार माजी सैनिक यांना सशस्त्र दलात झालेली सेवा अधिक ३ वर्ष इतका कालावधी सुट देण्यांत येईल.

४ (५) शासन निर्णय दिनांक ३.२.२००७ नुसार प्रकल्पग्रस्त उमेदवारासाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्ष राहील.

४ (६) पदविधर अंशकालीन उमेदवारासाठी सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दिनांक २०.०८.२००५ अन्वये पदविधर अंशकालीन म्हणून किमान तिन वर्ष काम केलेल्या व तिन वर्षाच्या अनुभवाची सेवायोजन कार्यालयाकडे नोंद केलेल्या अंशकालीन पदविधर उमेदवारांना कमाल वयोमर्यादा ४६ वर्ष राहील. अंशकालीन म्हणून काम केलेल्या तिन वर्षाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र तहसिलदार यांचे सहीचे असावे.

४(७) शासन निर्णय दिनांक ३०.११.९८ नुसार जनगणना कर्मचा-यांना जनगणना कार्यालयातील सलग सेवेचा कालावधी अधिक ५ वर्ष एवढी कमाल मर्यादा शिथील राहील.

४(८) अंपग उमेदवाराकरीता वयोमर्यादा कमाल ४५ वर्ष

४(९) अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडुंसाठी ५ वर्षापर्यत शिथीलतम

४(१०) विहित अर्हता व र्यामर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल केली जाणार नाही विहीत वयोमर्यादा नसलेल्या उमेदवारांचे अर्ज स्विकृत केले जाणार नाही.

**५. अधिवास :-** अर्जदाराने महाराष्ट्र राज्याचा रहीवासी असल्याबाबत शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिका-यांने दिलेल्या प्रमाणपत्राची सांक्षाकिंत प्रत अर्जासोबत जोडावी.

**६. खेळाडू अर्हता :-**

६(१) खेळाडू हा महाराष्ट्राचा रहीवासी असावा व त्याला मराठीचे ज्ञान असावे.

६(२) सदर खेळाडूचे सेवा प्रवेश नियमातील तरतुदीनुसार आवश्यक असलेली किमान शैक्षणिक व इतर अर्हता प्राप्त केलेली असावी.

६(३) खेळाडूची गुणवत्ता व पात्रता विचारात घेवून सदर पदासाठी असलेल्या वयोमर्यादेत ५ वर्षापर्यत वयाची अट शिथील करण्यांत येईल.

६(४) सदर खेळाडूनी त्या त्या खेळांच्या वैयक्तिक अथवा साधिक क्रिडा स्पर्धामध्ये किमान राज्य अजिक्य पद स्पर्धत प्रथम,व्दितीय अथवा तृतीय स्थान प्राप्त केलेले असावे.राज्य अजिक्य पद स्पर्धा या सदर खेळाच्या महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसियनशी संलग्न अधिकृत राज्य संघटनेने आयोजित केलेल्या असाव्यात.वैयक्तिरित्या किंवा आंमत्रित स्वरुपाच्या स्पर्धामध्ये भाग घेतलेल्या खेळाडूंचा यासाठी विचार केला जाणार नाही.

६(५) खेळाडूकडील प्रमाणपत्र संचालक,क्रिडा व युवकसेवा महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडून शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचनांनुसार आहे किंवा नाही हे तपासून घेण्यात येईल.

**भरती प्रक्रीया :-**

**७(१) अर्ज सादर करण्याबाबत आवश्यक सुचना :-**

**उमेदवारांची माहिती संगणकावर एकत्रित करण्यात येणार आहे. परीक्षेसाठी विहित केलेला अर्ज www.bhandara.nic.in व www.collectorbhn.in या संकेत स्थळावर उपलब्ध होईल. त्यावर असलेल्या अर्जात माहिती व स्वत:चा फोटो व स्वाक्षरी अपलोड करुन सादर करावा व प्रिंट आऊट काढून घ्यावी व इंटरनेटवर उपलब्ध होणारा नोंदणी क्रमांक जपून ठेवावा. आनलाईन अर्ज भरायला सुरुवात करण्याअगोदर परीक्षा शुल्क बॅंक चालान द्वारे भरणे आवश्यक आहे. बॅंक चालान चा नमुना www.collectorbhn.in या संकेत स्थळावरुन डाऊनलोड करुन प्रिंट करुन घ्यावा व त्यातील आवश्यक माहिती भरुन परीक्षा शुल्क नमुद केलेल्या बॅंकेत जमा करावे. या नंतरच आनलाईन अर्ज भरावा.**

७(२) उमेदवाराला कोणत्याही इंटरनेट कॅफे, किंवा उपलब्ध असलेल्या इंटरनेट सुविधा असलेल्या संगणकावरुन अर्ज भरता येईल.

७(३) **उमेदवारांनी माहिती भरण्यापूर्वी बॅंक चालान तयार करुन सोबत ठेवावा म्हणजे चालान बाबतची माहिती आवेदन पत्रावर भरता येईल. त्याशिवाय इंटरनेटवर अर्ज भरता येणार नाही. याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

७(४) **पात्र/अपात्र उमेदवारांची यादी शक्यता दिनांक ३० डिसेंबर २०१२ रोजी संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.**

७(५) परीक्षा प्रवेश पत्र उमेदवारास www.bhandara.nic.in व **www.collectorbhn.in** या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. **त्यामुळे अर्ज भरल्यानंतर इंटरनेटवर उपलब्ध होणारा नोंदणी क्रमांक जपून ठेवावा.** परीक्षा प्रवेशपत्र दिनांक ०७.०१.२०१३ पासून उपरोक्त संकेतस्थळावार उपलब्ध होईल.

// ७ //

प्रवेशपत्र प्राप्त करण्यास काही अडचण निर्माण झाल्यास दिनांक ११ व १२ जानेवारी २०१३ रोजी जिल्हाधिकारी, भंडारा यांचे कार्यालयातील परीक्षा नियंत्रण कक्षातून प्रवेश पत्र उपलब्ध करुन देण्यात येईल. लेखी परीक्षेकरीता कोणत्याही परिस्थितीत प्रवेशपत्राशिवाय परीक्षा केंदात प्रवेश दिला जाणार नाही.

७(६) परीक्षा प्रवेश व इतर परीक्षेविषयी माहिती ही www.bhandara.nic.in वर व **www.collectorbhn.in** या संकेत स्थळावर उपलब्ध राहील.

**अर्ज सादर केलेल्या उमेदवारास कागदपत्रांच्या छाननी शिवाय परीक्षेस बसण्याची परवानगी देण्यांत येत आहे. त्यामुळे उमेदवार परीक्षा पास झाल्यानंतर प्रवर्गनिहाय गुणाणुक्रमे उमेदवारांच्या कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर तात्पुरती निवड यादी प्रसिध्द करण्यांत येईल. केवळ परीक्षा पास झाल्यामुळे उमेदवारास कोणताही हक्क प्राप्त होणार नाही. त्यामुळे उमेदवाराने संबंधित पदांच्या पात्रतेच्या अटी अभ्यासूनच अर्ज सादर करावा.**

८. **परिक्षा शुल्क:-**

खूल्या प्रवर्गातील उमेदवारांनी रु.२००/- ( दोनशे रुपये फक्त ) व राखीव प्रवर्गातील उमेदवारांनी १००/- (शंभर रुपये फक्त) फक्त इतके परिक्षा शुल्क अर्जासोबत भरावयाचे आहे. सदरचे शुल्क हे **Bank Challan** च्या स्वरुपात **सदस्य सचिव, जिल्हा निवड समिती भंडारा** याचे नांवे स्टेट बॅंक ऑफ इंडीयाच्या कुठल्याही शाखेत जमा करणे आवश्यक आहे. सदर परिक्षा शुल्क नापरतावा राहील.

## ९.परिक्षेचे स्वरुप व निवड पध्दती :-

| पदांचा सांकेतांक | पदनाम | परिक्षेसाठी गुण | |
|---|---|---|---|
| | | लेखी परिक्षा | मुलाखत |
| १ | महाराष्ट्र नगर परिषद अभियांत्रिकी सेवा (स्थापत्य) (श्रेणी-क) | २०० | २५ |
| २ | महाराष्ट्र नगर परिषद अभियांत्रिकी सेवा (विद्युत) (श्रेणी-क) | २०० | २५ |
| ३ | महाराष्ट्र नगर परिषद अभियांत्रिकी सेवा (संगणक) (श्रेणी-क) | २०० | २५ |
| ४ | महाराष्ट्र नगर परिषद जलदाय, मलनिस्सारण व स्वच्छता अभियांत्रिकी सेवा (श्रेणी-क) | २०० | २५ |
| ५ | महाराष्ट्र नगर परिषद लेखापरिक्षण व लेखापाल सेवा (श्रेणी-क) | २०० | २५ |
| ६ | महाराष्ट्र नगर परिषद अग्नीशमन सेवा (श्रेणी-क-२) | २०० | २५ |

//    ८    //

**१०. परिक्षेचे स्वरुप व निवड पध्दती :-**

१०.१ **महाराष्ट्र नगर परिषद कर्मचारी संवर्गातील श्रेणी क** या पदाकरीता लागू असलेल्या शैक्षणिक पात्रतेच्या अभ्यासक्रमावर आधारीत राहील.

१०.२ **महाराष्ट्र नगर परिषद कर्मचारी संवर्गातील श्रेणी क** या पदासाठी २०० गुणांची लेखी परिक्षा व मुलाखात २५ गुणांची राहिल.

१०.३ लेखी परिक्षा वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची असेल. त्यासाठी १०० प्रश्नांना प्रत्येकी २ गुण याप्रमाणे २०० गुण असतील. १०० प्रश्नांपैकी ५० प्रश्न संबंधित सेवेच्या (पदाच्या) आवश्यक शैक्षणिक पात्रतेच्या स्तरावरील दर्जाचे असतील. उर्वरीत ५० प्रश्न मराठी, इंग्रजी व सामान्य क्षमता चाचणीशी निगडीत असतील. निगेटीव्ह मार्कींग पध्दत असणार नाही. लेखी परिक्षा १३.०१.२०१३ रोजी घेण्यात येईल. लेखी परिक्षेमधून पात्र होणा-या उमेदवारांना कागदपत्रे तपासणीचा दिनांक नंतर कळविण्यात येईल.

१०.४ एका पदासाठी २ किंवा अधिक उमेदवारास समान गुण प्राप्त झाल्यास खालील प्राधान्यक्रमाच्या आधारे उमेदवारांची अंतिम निवड केली जाईल.

१.स्वांतत्र सैनिकांचे नामनिर्देशीत व्यक्ती,संपकालीन कर्मचारी १९८१ /१९९९ चे जनगणना कर्मचारी,अंशकालीन पदविधर बेरोजगार

२.वयाने मोठा असलेला उमेदवार

३.उच्चशिक्षण असलेला उमेदवार

१०.५. लेखी परिक्षेस पात्र ठरणा-या उमेदवारांची यादी जिल्हाधिकारी कार्यालयाचे नोटीस बोर्डावर लावून प्रसिध्द करण्यांत येईल.

१०.६ लेखी परिक्षा भंडारा या जिल्हयातील परिक्षा केद्रावर होईल.त्याबाबतच्या विस्तृत सूचना खालील प्रमाणे आहेत परिक्षेचा दिनांक १३.०१.२०१३ आहे.

**११.नियम व अटी :-**

११.१ निवड प्रक्रीया सुरु झाल्यापासून ते नियुक्तीनंतरही कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जामधे दिलेली माहीती खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहीती लपवून ठेवल्याचे निर्दशनांस आल्यास त्या उमेदवारांची उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्यावर रद्य करण्यांत येईल वा करण्यांत आलेली नियुक्तीही रद्य करण्यांत येईल.

११.२ प्रथमच शासन सेवेत निवड व नियुक्त होणा-या उमेदवारांना परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन( DCPS ) योजना लागु राहील.

११.३ निवड समिती अध्यक्ष,सदस्य किंवा अधिकारी यांच्याकडे वशिला लावण्याचा प्रयत्न अगर कोणताही दबाव (प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष) आणल्यास संबंधित उमेदवारास अपात्र ठरविण्यांत येईल.

११.४ सदर परिक्षेसाठी विहित केलेल्या नमुन्यातील अर्ज Online च स्विकारले जातील.तथापी विहीत मुदतीत नंतर (दिनांक २७ डिसेंबर २०१२) प्राप्त झाल्यास कोणताही विचार केला जाणार नाही.

११.५ उमेदवार जर प्रत्यक्षात एखाद्या कार्यालयीन आस्थापनेवर कार्यरत असल्यास त्याची योग्य मार्गाने नाहरकतवजा अर्ज सादर केला पाहिजे.

११.६ बिनचुक पत्या अभावी उमेदवारास वेळीच पत्र व्यवहार होऊ शकता नाही तर त्याला निवड समिती जवाबदार राहणार नाही. निवड प्रक्रीयेच्या कोणत्याही टप्यावर अयशस्वी ठरलेल्या उमेदवाराविषयी कोणताही पत्र व्यवहार केला जाणार नाही.

११.७ निवड होंऊन नियुक्ती झालेल्या उमेदवारांना शासन निर्णयानुसार लागु असलेल्या सर्व विभागीय परिक्षा उतीर्ण होणे बंधनकारक राहील.तसेच त्यांना नियमानुसार बंधपत्र भरुन देणे,वैद्यकीय चाचणी करुन घेणे बंधनकारक राहील.

११.८ उमेदवारास परिक्षेस / मुलाखातीस येण्याजाण्याचा प्रवास खर्च दिला जाणार नाही.

११.९ विद्यमान भरती प्रक्रीया भर्ती करीता प्राप्त होणारे सुधारीत शासन निर्णय,न्यायालयीन आदेश याच्या अधिनतेने राहील. निवड झालेल्या उमेदवारांचा पोलीस विभागाकडून चारित्र व पूर्व इतिहास बोलविण्यांत येईल तो अनुकुल असल्याशिवाय संबंधीत उमेदवार नियुक्तीस पात्र राहणार नाही.

**<u>रिक्त पदे भरतीचा कार्यक्रम खालीलप्रमाणे आहे.</u>**

| अ.क्रं | भरती प्रक्रिया कार्यक्रम | कालावधी |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्याचा दिनांक | दिनांक १४.१२.२०१२ ते २७.१२.२०१२ सायं. ५.३० पर्यंत |
| २ | बँकेत विहित चलनाद्धारे परिक्षा शुल्क जमा करण्याचा अंतिम दिनांक | दिनांक २७.१२.२०१२ |
| ३ | पात्र / अपात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | दिनांक २९.१२.२०१२ |
| ४ | अपात्र ठरलेल्या अर्जाबाबत आक्षेप सादर करण्याची संधी व आक्षेपाची पूर्तता करून लेखी परिक्षेसाठी पात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | दिनांक ३०.१२.२०१२ दुपारी ३.०० वाजेपर्यंत |
| ५ | लेखी परिक्षेसाठी उमेदवारांची अंतिम यादी प्रसिध्द करणे | दिनांक १.१.२०१३ |
| ६ | लेखी परिक्षेसाठी ऑनलाईन प्रवेशपत्र उपलब्ध होण्याचा कालावधी | दिनांक ७.१.२०१३ ते १२.१.२०१३ पर्यंत. |
| ७ | लेखी परिक्षा दिनांक व वेळ | दिनांक १३.०१.२०१३ दुपारी ११.०० ते १.०० वाजेपर्यंत. |

<u>विशेष सुचना :-</u>

**१. या परिक्षेत ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना जरी उमेदवारांना कोणतीही कागदपत्रे सादर करावयाची आवश्यकता नाही. तरीही ज्या उमेदवारांकडे पदाकरता आवश्यक शैक्षणिक व इतर पात्रता नसेल अशा उमेदवारांनी विनाकारण अर्ज करू नयेत.**

दिनांक १२.१२.२०१२
**स्थळ :- भंडारा**

सदस्य सचिव
जिल्हा निवड समिती तथा
**मुख्याधिकारी,न.प. भंडारा.**